<u>प्रेसनोट</u>

दि.२१/०७/२०२०

सावकारांचे महानिबंधक व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे येथील वरिष्ठ लिपीक व इतर दोघांवर लाच मागणी केले प्रकरणी कारवाई.

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं. ३८/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७अ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - अशोक देवराम गिते, वय - ३६ वर्षे, पद - वरिष्ठ लिपिक , विशेष निबंधक, सहकारी संस्था. पुणे<br>२) लोकसेवक - नंदकिशोर रामचंद्र झीने वय - ५९ वर्षे, सेवानिवृत्त सहायक निबंधक संस्था, सध्या कंत्राटी पद्धतीने कार्यरत.<br>३) सतिश क्षीरसागर, सेवानिवृत्त विभागीय सह निबंधक (सहकारी संस्था) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | निरंक |
| थोडक्यात माहिती. | यातील तक्रारदार व अन्य दोन यांचे जमिनीसबंधाने उपनिबंधक/सावकारांचे निबंधक जालना, यांनी तसेच विभागीय निबंधक सहकारी संस्था औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्या प्रकरणांचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने दिला होता. त्या निकालाविरूद्ध पुनर्निरीक्षणाचे (रिव्हीजन) अर्ज सावकाराचे महानिबंधक व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे विरोधी पक्षकाराने दाखल केले होते.<br>त्या तीन रिव्हीजनपैकी दोन रिव्हीजनचे निकाल हे तक्रारदार यांचे विरोधात दिले गेले.<br>उर्वरित एक निकाल महानिबंधक यांना सांगून तक्रारदार यांच्या बाजूने करून देतो असे सांगून त्यासाठी एक लाख रूपयांची लाचेची मागणी केली. म्हणून वर नमुद तिघांचे विरूद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीसउप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्रीक्रमांक १०६४</u>
२. अॅन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट.